# उज्जीवन फायनान्शियल सर्व्हिसेसला आर्थिक वर्ष २०१६-१७ प्रथम तिमाहीत १०२.५१ टक्क्यांच्या वाढीने निव्वळ नफा

केअर आणि इक्रा यांच्याकडून दीर्घ मुदतीचे बँक मानांकन उंचावून ए+ आणि इक्राने अल्प मुदतीचे मानांकन ए+ असे वाढविले.

ग्रेट प्लेस टू वर्क इन्स्टिटट्यूटने इकॉनॉमिक्स टाइम्सच्या सहयोगाने केलेल्या सर्वेक्षणात भारतातील कार्य करण्यास तिसरे सर्वोत्तम ठिकाण म्हणून मान्यता.

**बेंगळुरू, (कौशिक माधवानी) :** भारतातील अग्रेसर सूक्ष्म वित्त संस्था उज्जीवन फायनान्शियल सर्व्हिसेस लि. डबीएसई: ५३९८७४; एनएसई: UJJIVAN],ने आपले ३० जून २०१६ अखेर समाप्त तिमाहीतील आर्थिक कामगिरी घोषित केली.

**सारांशात आर्थिक कामगिरी**

■ निव्वळ नफा रु. ७१.३७ कोटी; आर्थिक वर्ष २०१६ च्या पहिल्या तिमाहीतील नफ्याच्या तुलनेत १०२.५१ टक्के तर आधीच्या (चौथी तिमाही २०१५-१६) तिमाहीच्या तुलनेत २९.६६ टक्क्यांची वाढ

■ एकूण उत्पन्न रु. ३२९.३२ कोटी, आर्थिक वर्ष २०१६ च्या पहिल्या तिमाहीच्या तुलनेत ५०.४६ टक्के तर आधीच्या (चौथी तिमाही २०१५-१६) तिमाहीच्या तुलनेत १०.५२ टक्क्यांची वाढ

■ खर्चाचे उत्पन्नाशी गुणोत्तर ४५.६०%, आर्थिक वर्ष २०१६ च्या पहिल्या तिमाहीत ५४.२७% तर आधीच्या तिमाहीत ४८.७७% असे होते.

■ परिचालनात्मक खर्च गुणोत्तरही मागील वर्षातील प्रथम तिमाहीतील ७.९८% तसेच जाने-मार्च २०१६ तिमाहीतील ७.३४% वरून यंदा ७.२२% असे घसरले आहे.

■ ईपीएस रु. ६.३९; आरओएए ४.८५% आणि आरओएई २०.२७% असे आहे.